CMYK


कारंजा मानोरा मतदारसंघात इच्छुकांची भाऊगर्दी >>पान 2

'मुख्यमंत्री योजनादूत'; अर्ज करण्यास १७ सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ >>पान 3

डिझेल चोरी करणारी टोळी पोलिसांच्या जाळ्यात >>पान 4


**सुविचार**

संयम हा यश मिळविण्यासाठी लागणारा सर्वात महत्वाचा घटक आहे.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 39 ■ रविवार, दि. 15 सप्टेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




सिकंदरला हिट करण्याचा मास्टर प्लॅन!

आतील पान

# पर्यटनासह सर्वांगीण विकासाचा ध्यास, डॉ. ऋतुजा चव्हाण यांचा संकल्प



दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/विशेष प्रतिनिधी : जागतिक दर्जाचा पर्यटनाचा वारसा लाभलेल्या मेहकर लोणार मतदार संघ हा विदर्भातील विशेषत: पर्यटण विभागात मोडतो.मेहकर शहराला शिक्षणाचा वारसा लाभलेला आहे. तर लोणारला खार्या पाण्याच्या जागतिक सरोवरची ओळख आहे. बुलढाणा जिल्ह्यातील लोणार येथील उल्कापातामुळे निर्माण झालेल्या खाऱ्या पाण्याच्या सरोवराला जागतिक पर्यटन स्थळ म्हणून दर्जा मिळालेला असल्यामुळे या ठिकाणी देश विदेशातील पर्यटकांसह वैज्ञानिक संशोधनासाठी येतात. परंतु या जागतिक दर्जा मिळूनही या पर्यटनस्थळाचा व मतदार संघाचा ज्या प्रमाणात विकास व्हायला हवा होता. तो न झाल्याने या पर्यटकांसह सर्वासामान्यांचा हिरमोड झाला आहे. जागतिक वारसा लाभलेल्या या पर्यटनस्थळासह मतदार संघाचे नाव जागतिक स्तरावर नावलौकीक करण्यासाठी तसेच सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने उच्चविद्याविभूषीत डॉ. ऋतुजा चव्हाण यांनी रोडमॅप तयार केला आहे.**

डॉ. ऋतुजा चव्हाण यांचे हे व्हीजन नक्कीच विकासाची नांदी ठरणार असून मतदार संघातील नागरिकांमध्ये याबाबत आनंद व्यक्त केला जात आहे.

जागतिक दर्जाचा पर्यटनाचा उज्वल वारसा मिळालेला असताना या पर्यटनस्थळाचा विकास होण्याबरोबर कृषीशी निगडीत व्यवसायाचा सुद्धा विकास होणे अपेक्षीत होते.परंतु, राजकीय उदासीनता या विकासाला मारक ठरत आली आहे.मात्र येणार्या काळात या जागतिक दर्जाच्या पर्यटनस्थळाला व या मतदार संघाला सोन्याचे दिन आणण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करीत असलेल्या डॉ.ऋतुजाताई चव्हाण यांनी या पर्यटन क्षेत्रासाठी आणि येथील सुपीक जमिनीसाठी, कृषी आधारीत शाश्वत विकासाची आराखडा तयार केला आहे.या आराखड्यामध्ये शेतकरी, कष्टकरी, युवा तरुणवर्गांना रोजगार उपलब्ध करून देण्याची उत्तम योजना त्यांनी आखली आहे. रोजगार, उच्च शिक्षण, आरोग्य, स्किल या सर्व घटकांना समाविष्ट करून अतिशय साचेबद्ध विकास आराखडा तयार केला आहे. डॉ.ऋतुजाताई चव्हाण ह्या पेशाने डॉक्टर असल्यामुळे आधी रोगाचे निदान करून त्यावर ज्या प्रमाणे औषधोउपचार केल्या जातो. त्यानुसार त्यांनी मेहकर लोणार या विधानसभा मतदार संघातील समस्यारुपी आजार शोधून त्यावर सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने औषधोपचार करण्याचा आराखडा तयार केला आहे.

माता, भगिनींच्या सक्षमीकरणासाठी लघू उद्योग, गृहउद्योग यांना चालना देण्यासाठी उपाययोजना केल्या आहेत. शेतकरी, कष्टकरी, माता भगिनी, युवाशक्ती यांचा विकास हाच विकसित भारताचा पाया आहे. हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन डॉ. ऋतुजा चव्हाण ह्या गेल्या कित्येक दिवसांपासून मतदार संघातील समस्यांची माहिती घेऊन त्यावर सक्षम उपाय राबवित आहेत. त्यांचे हे विकासाचे व्हीजन नक्कीच मेहकर लोणार मतदार संघाचे चित्र पालटून टाकणारे आहे. त्यामुळे सर्वसामान्य मतदार वर्गही त्यांच्या या कामाचे कौतुक करीत आहे. तर, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, उद्योगिक अशा अनेक स्तरावर कार्य करून डॉ.ऋतुजा चव्हाण यांनी सर्वसामान्य मतदारांच्या मनात घर निर्माण केले आहे.

तर चला दृढ संकल्प घेऊया... ऋतुजाताईंना विधानसभेत पाठवूया.... असा संकल्पच या मतदार संघातील मतदारांनी केल्याचे दिसून येत आहे. सामाजिक कार्यातील डॉ. ऋतुजा चव्हाण यांचे योगदान पाहता त्यांच्यावर सर्वच स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# पोस्ट ऑफिसच्या योजनेत गुंतवलेत पैसे, १ ऑक्टोबरपासून या स्कीमवर मिळणार नाही व्याज




दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : सामान्य गुंतवणूकदारांसाठी पोस्टाकडून अनेक गुंतवणूक योजना राबवल्या जातात. छोट्या छोट्या गुंतवणुकीसाठी हे पर्याय खूप उत्तम असतात. अनेक ग्राहक त्यात गुंतवणूक करतात. पोस्टात गुंतवणूक करताना आता एक सरकारी आदेश जाणून घेतला पाहिजे. येत्या एक ऑक्टोबरपासून सरकार पोस्टाच्या नॅशनल स्म ॉल सेव्हिंग्ज योजनेच्या नियम ात बदल करत आहे. अर्थ मंत्रालयाने तसा अध्यादेश नुकताच जारी केला आहे.

पोस्टाच्या अल्पबचत गुंतवणूक योजनेचा अनेक ग्राहक लाभ घेतात. या खात्यांचे नियमन करण्याचा अधिकार अर्थ मंत्रालयाकडे असतो. आता मंत्रालयाने एक ऑक्टोबरपासून नवीन नियम जारी केले आहेत. त्यानुसार, एखादे खाते अनियमित असलेले आढळले, तर नियम ानुसार, अर्थ मंत्रालयाकडून त्या खात्याला आवश्यक नियमनासाठी पाठवले गेले पाहिजे.अनियमित राष्ट्रीय अल्पबचत खात्यांबाबत होणाऱ्या या बदलांमध्ये आणखीही काही गोष्टी साम ावलेल्या आहेत. डीजींच्या आदेशापूर्वी (२ एप्रिल १९९०) उघडण्यात आलेल्या दोन एनएसएस-८७ खात्यांअंतर्गत पहिल्यांदा उघडलेल्या खात्यावर योजनेचा प्रचलित दर लागू होईल, तर दुसऱ्या खात्यावर प्रचलित इध्एअ दरासह शिल्लक राहिलेल्या रकमेवर २०० बीपीएसचा दर लागू केला जाईल.

या दोन्ही खात्यांवरची जमा रक्कम वार्षिक मर्यादेपेक्षा जास्त नसावी. अतिरिक्त रक्कम जमा करण्यात आली, तर त्यावर व्याज न देताच ती परत दिली जाईल. १ ऑक्टोबरपासून दोन्ही खात्यांवर कोणतंही व्याज मिळणार नाही.

एखाद्या ग्राहकाची दोनपेक्षा जास्त एनएसएस-८७ खाती असतील, तर दोन खात्यांसाठी लागू करण्यात आलेले नियम त्या खात्यांना लागू केले जातील व तिसरं जे खातं अधिक अनियमित आहे, त्याला कोणतंही व्याज मिळणार नाही. तसंच मूळ रक्कम गुंतवणूकदाराला परत केली जाईल.

राष्ट्रीय अल्पबचत योजनेव्यतिक्त आणखीही काही योजनांच्या नियमांमध्ये बदल करण्यात आले आहेत. अल्पवयीन व्यक्तीच्या नावावर पीपीएफ खातं उघडल्यास, ती व्यक्ती १८ वर्षांची होईपर्यत पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज अकाउंटप्रमाणे व्याज दिलं जाईल. अल्पवयीन व्यक्ती जेव्हा खातं उघडण्यास पात्र ठरेल, तेव्हाच पीपीएफचं व्याज दिलं जाईल. त्यानंतर पीपीएफसाठी लागू दरानं व्याज दिलं जाईल. एनआरआय पीपीएफ खात्यांवर ३० सप्टेंबरपर्यत इध्एअ खात्याप्रम ाणे व्याज मिळेल, त्यानंतर अशा खात्यांवर कोणतंही व्याज दिलं जाणार नाही.

टपाल खात्याला लागू होणाऱ्या या नव्या नियम ानुसार, एखाद्या व्यक्तीनं एखाद्या मुलीचे सुकन्या समृद्धी योजनेचे खाते उघडले असेल आणि तो तिचा कायदेशीर पालक नसेल, तर त्या व्यक्तीला ते खाते कायदेशीर पालकांच्या नावावर करावं लागेल. तसे न झाल्यास ते खाते बंद केले जाऊ शकते.

पोस्टाच्या एनएसएस योजनेमध्ये गुंतवणूक केली असेल किंवा करणार असाल, तर ग्राहकांनी बदललेल्या नियमांबाबत जाणून घेण्याची गरज आहे.

# कालभैरव प्रतिष्ठानच्या बाप्पाची सर्वांत लहान बाप्पा म्हणून 'इंडिया बुक रेकॉर्ड'मध्ये नोंद

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर :** राज्यभरात गणपती बाप्पाचं घरोघरी आगमन झालं. सर्वत्र गणेशोत्सवाचा उत्साह पाहायला मिळत आहे. गणेशाचे भक्त फक्त भारतातच नाही तर, जगभरात आहेत. इतर देशांमध्येही गणेशाची आराधना केली जाते. अनेक देशांमध्ये गणेशाच्या मूर्तीही पाहायला मिळतात. तुम्हाला ऐकून नवल वाटेल पण, श्री गणेशाची सर्वांत लहान मूर्ती महाराष्ट्रात तयार करण्यात आली आहे. त्या मूर्तीची नोंद 'इंडिया बुक रेकॉर्ड'मध्ये झाली आहे. सार्वजनिक गणेश मंडळात बाप्पाची सर्वांत मोठी मूर्ती बसवण्याची जणू स्पर्धा सगळीकडे लागली आहे. मात्र, त्यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणींकडं कोणाचं लक्ष जात नाही. आता सर्वांत मोठा नव्हे तर सर्वांत छोटा गणपती शहरात बसवण्यात आलाय. पर्यावरण जपण्यासाठी, कणाकणांत आणि मनांमनांत देव ही संकल्पना समोर ठेवत





८ मिमी तांदळावर ६ मिमी आकाराचा हा बाप्पा साकारण्यात आलाय. त्याचं दर्शन दुर्बिणीच्या माध्यमातून घ्यावं लागतं. या बाप्पाची नोंद 'इंडिया बुक रेकॉर्ड'मध्ये करण्यात आली आहे. तर 'सर्वांत लहान सार्वजनिक गणेश' म्हणून बहुमान देण्यात आलाय. तसं प्रमाणपत्र देखील या मंडळाला देण्यात आलं आहे. सर्वांत लहान बाप्पाची स्थापना हडको परिसरातील कालभैरव प्रतिष्ठानतर्फे यंदा जगातील सर्वांत छोट्या बाप्पाची स्थापना करण्यात आली आहे. ८ मिमी तांदळाच्या दाण्यावर ६ मिमी जाडी आणि दीड मिमी एवढी रुंदी असलेली जगातील सर्वात लहान मूर्ती साकारण्यात आलीय. शहरातील कलाकार गजेंद्र वाढोनकर यांनी हा बाप्पा तयार केला आहे. सध्या सर्वत्र सार्वजनिक गणेश मंडळात सर्वांत मोठी मूर्ती बसवण्याकडं कल आहे. मात्र त्यामुळं निर्माण होणाऱ्या अडचणी कोणीही लक्षात घेत नाहीत. त्यामुळं मंडळाच्या सदस्यांनी एक महिना आधी झालेल्या बैठकीत चर्चा केली. त्यात मंडळाचे सल्लागार गणेश भालेराव यांनी सर्वांत लहान बाप्पाची संकल्पना मांडली आणि सर्वांनी त्याला होकार दिला. त्यातूनच तांदळाच्या दाण्यावर बाप्पा साकारून त्याची स्थापना करण्यात आली. सार्वजनिक गणेश मंडळात स्थापित होणार सर्वांत लहान बाप्पा म्हणून इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे.

## १० वर्षानंतर पाळणा हलला; बारशातून परतताना बाळासह कुटुंबावर काळाचा घाला!

**छ. संभाजीनगर** : छत्रपती संभाजीनगरमध्ये १० वर्षानंतर झालेल्या बाळाच्या बारशातून परतणाऱ्या कुटुंबावर काळाने घाला घातला. मद्यधुंद अवस्थेत गाडी चालवणाऱ्या दोन तरुणांच्या स्कॉर्पिओने त्यांच्या कारला जोरदार धडक दिली. यात चार जणांचा जागीच मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये आई, बाळ, आणि दोन लहान मुलांचा समावेश आहे, तर दोघे गंभीर जखमी झाले आहेत.


ही दुर्घटना वाळुज एम आयडीसी परिसरातील नगर रोडवर घडली. दारू पिऊन स्कॉर्पिओ चालवणाऱ्या विशाल चव्हाण (२२) आणि कृष्णा केरे (१९) यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी त्यांना अटक केली आहे. या घटनेने शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

# अंतर्गत सर्व्हेने भाजपामध्ये खळबळ

## विदर्भात जागा घटण्याचा कयास : लोकसभेची पुनरावृत्ती होण्याची शक्यता

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : लोकसभा निवडणुकीनंतर विदर्भात पुन्हा भाजपला फटका बसण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यामुळे जागा घटणार असल्याचा अंदाज असून अंतर्गत सर्व्हेशनाने भाजपचे टेन्शन वाढविले आहे. लोकसभा निवडणुकीत दारुण पराभव पत्करावा लागल्यानंतर आता महायुती सरकारने विधानसभेसाठी कंबर कसली आहे. राज्यातील सरकार कायम राखण्यासाठी महायुतीकडून रणनीती आखली जात आहे. पण बहुतांश निवडणूकपूर्व सर्व्हेत महायुतीच्या विरोधात असल्याचे समोर आले आहे. त्यानंतर आता भाजपच्या अंतर्गत सर्व्हेची आकडेवारी समोर आली आहे. त्या सर्वेक्षणाने भाजपची चिंता वाढली आहे.



२०१९ मध्ये भाजपशिवसेनेच्या युतीने विदर्भात विधानसभेच्या ६२ पैकी ३३ जागा जिंकल्या होत्या. भाजपने २९, तर शिवसेनेने ४ जागांवर विजय मिळवला होता. सध्याच्या घडीला महायुतीत तीन पक्ष आहेत. विदर्भात महायुतीचे सध्या ३९ आमदार आहेत. पण येत्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला केवळ २५ जागांवर यश मिळेल, असा भाजपचा अंतर्गत सर्व्हेचा अंदाज आहे. त्यामुळे भाजपच्या गोटात चिंतेचं वातावरण निर्माण झाले आहे. लोकसभेला विदर्भात महाविकास आघाडीला मोठे यश मिळाले आहे. विदर्भातील १० पैकी ७ जागांवर मविआचे उमेदवार जिंकले. तर महायुतीला केवळ ३ जागा मिळाल्या. भाजपच्या जागा ५ वरुन ३ वर आल्या. आता विधानसभेलादेखील लोकसभेचीच पुनरावृत्ती होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. २०१९ मध्ये २९ जागा जिंकणाऱ्या भाजपला १८ जागा मिळण्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. त्यामुळे भाजपची धाकधूक वाढली आहे. विशेष म्हणजे नागपुरातील १२ जागांपैकी केवळ ४ जागा मिळतील असे सर्व्हे सांगत असल्याचे समोर आले आहे. विदर्भात महायुतीला ६२ पैकी २५ जागांवर यश मिळेल, असा भाजपच्याच अंतर्गत सर्व्हेत समोर आले असल्याची माहिती आहे. भाजपला १८, शिंदेसेनेला ५, तर अजित पवार गटाला २ जागा मिळण्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. महायुतीच्या विदर्भात १४ जागा कमी होतील, असा कयास आहे. अजित पवार गटाच्या आमदारांची संख्या ४ वरुन २ वर येण्याची शक्यता आहे. पण शिंदेसेनेच्या आमदारांचा आकडा ३ वरुन ५ वर जाऊ शकतो. त्यामुळे शिंदेंना फायदा होताना दिसत आहे.

## लोकसभेनंतर काँग्रेस सुस्साट

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत विदर्भात काँग्रेसने ५ जागा जिंकल्या. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या विदर्भात काँग्रेसने निम्म्या जागा जिंकल्या आहेत. अकोला, नागपूरची जागा वगळता भाजपच्या हाती काहीच लागले नाही. आता विधानसभेला हाच पॅटर्न रिपीट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे भाजप नेत्यांची धास्ती वाढली आहे. तर काँग्रेस सुसाट असल्याचे चित्र आहे.

# ईद-ए-मिलाद सुट्टीच्या तारखेत बदल; सरकारचा मोठा निर्णय!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : सोमवारी १६ सप्टेंबर रोजी मुस्लिम बांधवांचा 'ईद-ए-मिलाद'हा सण साजरा करण्यात येणार आहे. या दिवशी देशभरातील सर्व शैक्षणिक संस्थांसह सर्व सरकारी कार्यालये, न्यायालये, बँका आणि शाळांना सुट्टी असते. मात्र या सार्वजनिक सुट्टीबाबत सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. त्यामुळे १५ सप्टेंबर रोजी रविवार आणि १७ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्थी अशा सलग तीन दिवस सुट्टी असल्यामुळे अनेकांनी बनवलेले हॉलिडेचे प्लॅनिंग काहीसे बिघडणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. 'ईद मिलाद उन-नबी' यासाठी राज्य सरकारने शासकीय सुट्टी जाहीर केली होती. मात्र १७ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्थी असल्याने दोन्ही सणांमध्ये शांतता आणि सलोखा कायम राहावा, यासाठी मुंबई शहर आणि उपनगरासह इतर जिल्ह्यांमध्ये मुस्लिमधर्मियांनी जुलूस काढण्याचा निर्णय १८ सप्टेंबर रोजी घेतला आहे. त्यामुळे १६ सप्टेंबर रोजी देण्यात येणारी शासकीय सुट्टी रद्द करून १८ सप्टेंबर रोजी देण्यात येणार आहे. याबाबत सामान्य प्रशासन विभागाने जिल्हाधिकाऱ्यांना पत्र काढून निर्णय घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, नंदुरबार जिल्ह्यात हजरत मोहम्मद पैगंबर यांची जयंती निमित्त सामाजिक सलोखा कायम ठेवण्यासाठी मुस्लीम समाज बांधवांनी १६ ऐवजी १९ सप्टेंबर रोजी मिरवणूक काढण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे प्रशासन आणि पोलीस यंत्रणांवरील ताण कमी होण्यास मदत होणार आहे.


CMYK

## सण-उत्सवातून अर्थशक्ती निर्माण होते

लोकांच्या रीतिरिवाजांचा, स्थानिक रूढी-परंपरांचा, सण-उत्सवांचा, त्यांच्या आशा-आकाक्षांचा, विविध समूहांच्या श्रद्धांचा, त्यांच्या आवडी-निवडीचा, कौटुंबिक व सामाजिक पोताचा, मुख्य म्हणजे रोज सुरू असणार्या सांस्कृतिक अभिक्रियेचा अभ्यास केल्याशिवाय उद्योजकांना पुढे जाताच येत नाही. उद्योजकाला या सर्वांचं भान असेल तर त्याची बाजारपेठेवरील पकड घट्ट व्हायला मदत होते. लोकांच्या भौतिक आणि आंतरिक अवस्थेचं प्रतिबिंब म्हणजे बाजारपेठ. सण हे बाजारपेठेसाठी महा-इव्हेंट आहेत. सण-उत्सव-समारंभ नाहीसे झाले तर बाजारपेठ कोरडीठाक पडेल आणि अर्थव्यवस्थेवर ती गंभीर परिणाम करेल. म्हणूनच अर्थजगताशी निगडित प्रत्येकाने सणांचं ऋणी असलं पाहिजे. विघ्नहर्त्या गणपती-गजाननाचे आगमन हे कुटुंबामध्ये, सार्वजनिक ठिकाणी होताना सगळीकडे चैतन्याचे, आनंदाचे वातावरण असते. लोकमान्य टिळकांचे गणपती उत्सवाला सार्वजनिक स्वरूप देण्याबद्दल किती वेळा आभार मानले तरी ते अपुरेच पडतील. कारण, आपला समाज हा कौटुंबिक आणि आध्यात्मिक दृष्टीने आत्मकेंद्रीत आहे. त्यामुळे समष्टि साधना, सामाजिक कार्य व त्यातून निर्माण होणारे संघटन यापासून समाज खूपच दूर असतो. लोकमान्य टिळकांनी शिवजयंती आणि गणेशोत्सव सार्वजनिकरित्या साजरे करायचे, ही संकल्पना समाजात रुजवून सर्व समाजाला त्यावेळच्या राजकीय इंग्रजी राजवटी विरुद्ध संघटित केले. म्हणूनच त्यांना त्यावेळच्या भारतीय राजकारणाचे 'असंतोषाचे जनक' अशी पदवी देण्यात आली. आपल्या सर्वांना माहीतच आहे की, गांधीजींच्या राजकारणातील प्रवेशापूर्वीच भारतभर भ्रमण करून लोकमान्य टिळकांनी भारतीय स्वातंत्र्याची मानसिकता तयार केली होती. लोकमान्य टिळकांचा दुसरा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय म्हणजे 'स्वदेशीचा पुरस्कार' आणि 'आधुनिकतेचा अंगीकार.' त्यावेळच्या फारच कमी लोकांना इंग्रजांची अर्थनीती समजली होती. सर्व वसाहतींमधून स्वस्तातला कच्चा माल, स्वस्त गुलाम व कामगार यांच्याकडून उच्च दर्जाची उत्पादने तयार करून ती युरोप व अमेरिकेत आणि इतर भरभराटीला आलेल्या शहरांमध्ये विकणे आणि त्यातून कित्येक पट फायदा आपल्या राष्ट्रासाठी घेऊन जाणे. ही इंग्रजांची उद्योगनीती कायमच त्यांना फायदा मिळवून देत होती. तसेच १८५३ साली ब्रिटिशांनी पहिली प्रवासी रेल्वे कलकत्ता ते हुगळीपर्यंत सुरु केली. त्याचा हळूहळू विस्तार होत गेला. पर्यटन वाढवणे हा देखील त्यामागचा एक महत्त्वपूर्ण उद्देश होता. प्रवासी रेल्वेचा प्रवाशांना बाजारपेठेला जोडणे आणि अर्थव्यवस्थेतील व्यापाराला चालना देण्यावर लक्षणीय परिणाम झाला. १८५० ते १९४७ पर्यंत रेल्वे हा भारताचा महत्त्वपूर्ण पायाभूत विकास होता. एवढे विस्तृत विवेचन गणेशोत्सवाचे करण्यामागील कारण म्हणजे, आपल्याला आत्तापर्यंत सण-उत्सव, परंपरा, देवळे, कुंभमेळे याची फक्त धार्मिकताच समजली. पण, यातून निर्माण होणारी अर्थसंपत्ती आपल्या अजून लक्षात आलेली नाही, हे प्रकर्षाने दिसून येते. श्रावण साधारण ऑगस्टमध्ये सुरु होतो. सप्टेंबरमध्ये गणपती, ऑक्टोबरमध्ये नवरात्र आणि नोव्हेंबरमध्ये दिवाळी हे सण खास करून महाराष्ट्र तसेच मध्य भारत, उत्तर भारत आणि पूर्व भारतात तर उगादी, ओणम डिसेंबर-जानेवारी महिन्यात दक्षिणेकडे साजरे होतात. असे सर्व सण-उत्सव वर्षभर खूप मोठ्या प्रमाणात भारतात साजरे केले जातात. या सगळ्यातून जी अर्थशक्ती निर्माण होते, त्याला अर्थशास्त्रामध्ये 'बिग एम' (सार्वजनिक ठिकाणी निर्माण होणारी संपत्ती) असं म्हटलं जात. तो कसा कार्यरत होतो ते पाहूया. गणेशोत्सवानिमित्त घरगुती दीड दिवस, सात दिवस, दहा दिवस गणपती बसविले जातात. सार्वजनिक मंडळांचे थाटा-माटात दहा दिवस गणपती बसतात. महाराष्ट्रात सुमारे पाच ते दहा लाख वैयक्तिक गणपती बसवले जातात, तर सुमारे २५ हजार ते एक लाख सार्वजनिक मंडळांमधून गणेशोत्सव साजरा केला जातो. अगदी लहान मुलांपासून ते महिला आणि अबालवृद्धांपर्यंत तसेच गावखेड्यांपासून ते अगदी शहरातील टॉवर्सपर्यंत सगळीकडे गणेशोत्सवाचा उत्साह पाहायला मिळतो. एकंदरीतच या काळात बाजारपेठ ग्राहकांनी फुललेली असते. चार पैसे सढळ हाताने खर्च करण्याकडे बर्याचजणांचा कल असतो. आता आपण त्यातल्या एकेक गोष्टींचा विचार केला तर १) गणपतीची मूर्ती २) मूर्ती घडवणारे मूर्तिकार ३) कारखान्यातील कामगार इत्यादींची संख्या एवढी प्रचंड आहे की, चीनलाही गणेश मूर्ती बनवण्याचा मोह आवरता आला नाही. ४) गणपतीसाठी केली जाणारी आरास व त्यासाठी लागणारे कागद, लाकडाचे, प्लास्टर ऑफ पॅरिसचे देखावे इत्यादी साहित्यासाठी लागणारी अर्थशक्ती, अमर्याद क्रिएटिव्हिटी व यातून वाढणारा टर्नओव्हरही प्रचंड असतो. ५) पहिल्या दिवशी होणारी शास्त्रशुद्ध पूजा व पूजेसाठी लागणारी पूजेची भांडी, पत्री, फुलं, नैवेद्य हे पूजा द्रव्य, गणपती सहस्रावर्तन, गणपती अथर्वशीर्ष पठण, नातेवाईक-मित्रमंडळींसाठी केलेले कार्यक्रमाचे आयोजन, भोजन समारंभ, भंडारा यासाठी वापरण्यात आलेले नारळ, गूळ, तांदळाचे पीठ, हजारो किलो पेढ्यांची निर्मिती या सर्वांच्या निर्मितीसाठी कार्यरत असलेले कारखाने, तेथे काम करणारी माणसे, गणपती बाप्पाला वाजत-गाजत आणणारे वाजंत्री, मिरवणुकींचाही यात समावेश आलाच. 'मिरवणूक' या शब्दाची फोड केली, तर 'मिरवण्यासाठी केलेली नेमणूक' होय. त्यामुळे मिरवणुकीत मिरवण्यासाठी कपडे-लत्ते आले. इतमामाप्रमाणे पुन्हा बाजारात जाणे आले. झब्बे, नऊवारी साड्या, दागदागिने यांची खरेदी आली. यावेळी खिशावर थोडा ताण पडत असला तरी सगळे त्याचा पुरेपूर आनंद घेत असतात. उत्स्फूर्तपणे केलेल्या खरेदीत आनंद, आश्र्चर्य आणि समाधान असतं. मुख्य म्हणजे अर्थव्यवस्थेला गती मिळते. उत्स्फूर्त खरेदीचा वेग आणि प्रमाण हे केवळ सणाच्या काळात वाढतं. यादृष्टीने आपण सण-उत्सवाकडे पाहिलं तर आपण बाजारपेठेला मिळणार्या निमित्तांच्या दृष्टीने आपण खूपच समृद्ध आहोत. त्यात आंतरराष्ट्रीय सण-उत्सवांची भर पडली आहे. हेही कमी म्हणून की काय, बाजारपेठेच्या प्रोत्साहनातून नवे सण-उत्सव तयार झाले आहेत.

# कारंजा मानोरा मतदारसंघात इच्छुकांची भाऊगर्दी

## पक्षश्रेष्ठींची उमेदवारीबाबत वाढणार डोकेदुखी : मतांचे विभाजन कोणाच्या पारड्यात



दैनिक आपला विदर्भ

■ ईश्वर राठोड

**मानोरा :** आगामी होऊ घातलेल्या कारंजा मानोरा विधानसभेच्या निवडणुकीसाठी डजनावर इच्छुक उमेदवारांनी आतापासून आतापासूनच कंबर कसली आहे. त्यामुळे राजकीय वातावरण चांगलेच गरज झाले असून यंदाची विधानसभा निवडणुकी अतिशय चुरशीची व बहुरंगी होणार असल्याचे चित्र सध्यातरी दिसून येत आहे. त्यातच भाजप आणि कॉंग्रेसच्या उमेदवारीत उलटफेर होणार अशी अटकळ बांधली जात असून पक्षश्रेष्ठी काय निर्णय घेते, कोणाकोणाच्या हाती बंडांचा झेंडा राहते, या घडामोडींकडे कारंजा मानोरा मतदारसंघातील जनतेचे लक्ष लागले आहे. कारंजा मानोरा मतदारसंघाचे दिवंगत आ. राजेंद्र पाटणी यांच्या निधनामुळे रिक्त असलेल्या या मतदारसंघात अनेकांना आमदारकीचे डोहाळे लागले आहेत.भाजपकडून इच्छुकांमध्ये पाटणी यांचे चिरंजीव ज्ञायक पाटणी, राजु पाटील राजे, डॉ. राजु काळे, नरेंद्र गोलेच्छा यांच्या नावाची चर्चा आहे.तर राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून जि.प. अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे, माजी आमदार स्व.प्रकाश डहाके यांच्या पत्नी सई प्रकाश डहाके, युसुफ पुंजाणी, शरद पवार गटाकडून डॉ. श्याम जाधव, ज्योतीताई गणेशपुरे, भोजराज चव्हाण, सुनील पाटील, शिवसेना उबाठा गटाकडुन डॉ. सुभाष राठोड, सुनील महाराज तर कॉंग्रेसकडून प्रदेश सरचिटणीस देवानंद पवार यांच्यासह सुनील धाबेकर व अजून दोन जण इच्छुक आहेत. देवानंद पवार यांनी निवडणुकीच्या आधीच मतदारसंघ 'समस्या शोध दिंडी' काढत पिंजून काढला आहे. त्यांच्याकडे कारंजा व मानोरा परिसरातील तरुणवर्गाची मोठी मोट आहे. तर काहींनी उमेदवारीसाठी प्रदेशस्तरापर्यंत फिल्डींग लावली आहे. जातीय समीकरणांची जुळवाजुळव पाहता अनेकांना यावेळेस उमेदवारीचा आशावाद आहे. बच्चु कडु यांच्या प्रहार पक्षाकडून मानोरा नगर पंचायतीचे नगराध्यक्ष हेमेंद्र ठाकरे हे शड्डु ठोकून आहेत. त्यांनी मतदारसंघात जनसंपर्क वाढवला आहे.सामाजिक कार्यकर्ते प्रणित मोरे यांनी सुद्धा मतदारसंघ पिंजून काढला असुन त्यांच्या कडून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. शिवसेना शिंदे गटाकडून डॉ.महेश चव्हाण यांनी सुद्धा मतदारसंघ पिंजून काढला असुन विविध सामाजिक उपक्रम हाती घेत मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत आहेत. वचिंत आघाडीकडून ही अनेक जण इच्छुक आहेत. त्यांच्या उमेदवारीमुळे मतांचे विभाजन होऊन यामुळे निवडणूकीत कोणाला फटका बसणार हे येणारा काळच सांगेल.

**लोकसभा निवडणुकीत भाजपच्या उमेदवारापेक्षा शिवसेनेच्या उमेदवाराला तब्बल २० हजारांवर जास्त मते मिळाली.या मतांमुळे अनेकांची गणित विस्फटली आहेत. तर अनेकांना आमदारकीचे वेध लागले आहेत.त्यामुळे कारंजा मानोरा मतदार संघात विधानसभेची निवडणुकी अतिशय चुरशीची व बहुरंगी होणार असल्याचे चित्र सध्यातरी दिसून येत आहे.**

# शेतमालावरील आयात निर्यात शुल्कात बदल

- ➤ केंद्राचा ऐतिहासिक, क्रांतिकारी निर्णय : माजी कृषिमंत्री डॉ.अनिल बोंडे
- ➤ अनिल बोंडे यांच्या नेतृत्वात शेकडो शेतकऱ्यांचा जल्लोष
- ➤ प्रधानमंत्री मोदी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मानले आभार





दैनिक आपला विदर्भ

**अमरावती / प्रतिनिधी :** केंद्र सरकारने शेतमालावरील आयात निर्यात शुल्कात बदल करण्याचा क्रांतिकारी आणि ऐतिहासिक निर्णय घेतल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण आहे. भाजप नेते तथा राज्यसभेचे खासदार अनिल बोंडे यांच्या नेतृत्वात शेकडो शेतकऱ्यांनी अमरावतीच्या चांदुररेल्वे मार्गावर मोठा जल्लोष साजरा केला. फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांचे अनिल बोंडेसह शेतकऱ्यांनी आभार मानले. केंद्र सरकारने खाद्यपदार्थांवरील आयात निर्यात शुल्कात बदल केल्यामुळे महाराष्ट्रातील त्यातल्या त्यात विदर्भातील सोयाबीन, कापूस, कांदा, बासमती तांदूळ उत्पादक शेतकऱ्यांना या निर्णयामुळे विशेष लाभ मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी मोदी सरकारने घेतलेला हा ऐतिहासिक व क्रांतिकारी निर्णय आहे, असे अनिल बोंडे यांनी स्पष्ट करत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांचे आभार मानण्यात आले.

### ऐतिहासिक, क्रांतिकारी निर्णय : डॉ. अनिल बोंडे

विदर्भात शेतकरी मोठ्या प्रमाणात सोयाबीन, कापूस, कांदा इत्यादी पिकांचे उत्पन्न घेतो. केंद्राने खाद्यपदार्थांवरील आयात निर्यात शुल्कात बदल केल्यामुळे शेतकऱ्यांना या निर्णयाचा थेट मोठा फायदा होणार आहे. केंद्र सरकारने हा ऐतिहासिक व क्रांतिकारी निर्णय घेतल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. हजारो शेतकऱ्यांकडून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानत असल्याची माहिती माजी कृषिमंत्री तथा खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी यावेळी दिली.

# सिकंदरला हिट करण्याचा मास्टर प्लॅन!

**मुंबई / प्रतिनिधी :** सध्या सलमान खान त्याच्या आगामी 'सिकंदर' चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटात सलमान खानसोबत रश्मिका मंदान्ना मुख्य भूमिकेत दिसणार आहे. २०२५ च्या बहुप्रतिक्षित चित्रपटांपैकी हा एक आहे. याची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. 'सिकंदर'चे शूटिंग जूनमध्ये सुरू झाले होते, ज्याचे अनेक फोटोही समोर आले आहेत. चित्रपटाबाबत रोज नवनवीन अपडेट्स आणि माहिती समोर येत आहे. आता ही माहिती समोर आली आहे की, सलमान खान आणि रश्मिका मंदान्ना या चित्रपटात शानदार डान्स परफॉर्मन्स करणार आहेत.



मिड-डेच्या रिपोर्टनुसार, या गाण्यात सलमान खान आणि रश्मिका मंदान्ना यांच्यासोबत २०० बॅकग्राउंड डान्सर्स असणार आहेत. हे गाणे प्रीतमने संगीतबद्ध केले आहे. या गाण्याचा सेट गोरेगाव येथील एसआरपीएफ मैदानावर तयार करण्यात आला आहे. या मैदानाची रचना झोपडपट्ट्यांसारखी करण्यात आली आहे. रिपोर्ट्सनुसार, झोपडपट्टीत राहणारे लोक गाण्यात पूर्णपणे आनंदी मूडमध्ये दाखवले आहेत.

मिड-डेच्या वृत्तानुसार, या गाण्यात झोपडपट्टीत राहणारे लोक सण साजरा करताना दाखवण्यात आले आहेत. गाण्यात सलमान कस्टमाईज्ड सिल्व्हर चेन, कानातले, ब्लॅक व्हेस्ट आणि डेनिमसह फुल स्लीव्ह शर्ट घातलेला दिसणार आहे. तर रश्मिका सलवार कमीजमध्ये पारंपारिक लूकमध्ये दिसत आहे. चित्रपटाचे शूटिंग मुंबईत ऑक्टोबरपर्यंत सुरू राहण्याची शक्यता आहे. यानंतर टीम शेड्यूलसाठी युरोपला जाईल. दोन रोमँटिक गाणी तिथे शूट होणार आहेत.

# पेंडिंग कामे नवीन सरपंच येतात लागली मार्गी; गावाची विकासाकडे वाटचाल

## सर्वांगिण विकासाला प्राधान्य देणार असल्याची सरपंच आखाडे यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव / प्रतिनिधी :** जिल्ह्यातील लोकसंख्येच्या तुलनेत सर्वात मोठी ग्रामपंचायत म्हणून ओळख असलेल्या डोणगाव ग्रामपंचायत ही नेहमीच राजकीय चक्रवादात अडकलेली ग्रामपंचायत म्हणून चर्चेत असते. त्यामुळे तब्बल ३५ हजार लोकसंख्या असलेल्या डोणगाव गावाचा विकास खुंटला होता. मात्र दि.२२ ऑगस्ट २०२४ रोजी शिवचरण आखाडे यांनी सरपंच पदाचा भार घेताच अनेक वर्षांपासून पेंडिंग असलेली कामे मार्गी लावली आहेत.त्यामुळे आता डोणगाव ग्रामपंचायतीने एक पाऊल पुढे टाकून विकासाकडे वाटचाल सुरू केली आहे. जिल्ह्यातील लोकसंख्येच्या तुलनेत मोठी ग्रामपंचायत असल्याने डोणगाव ग्रामपंचायतीमध्ये अनेक कामे करण्यास वाव आहे. परंतु, राजकीय चक्रात व वादाच्या भवऱ्यात अडकलेली ही कामे अनेक वर्षांपासून पेंडिंग होती. नव्या उमेदीचे व विकासाची जान अशी ओळख असलेल्या शिवचरण आखाडे यांनी सरपंच पदाचा पदभार घेताच गावातील अनके कामे मार्गी लावली आहेत. गावातील नागरिकांचे आरोग्य अबाधीत राहावे, यासाठी गावात धूर फवारणी केली आहे. गावाची साफसफाई, लाईटची व्यवस्था करण्याचे काम हाती घेतले आहे. तर मागील अनेक वर्षांपासून पेंडिंग असलेले करोड रुपयांची कामे हे तात्काळ मार्गी लावली आहेत. आता गावाच्या विकासाची वाट मोकळी झाली आहे. यामध्ये विविध विकास कामे हे लवकरच डोणगाव मध्ये होणार. तर प्रत्येक कुटुंबाला दोन कचराकुंडी देण्याचे निर्धार ग्रामपंचायतीने केला आहे.



जवळपास पाच ते साडेपाच हजार कुटुंबीयांना कचराकुंडी देण्यात येणार असल्याची माहिती. ग्रामविकास अधिकारी दीपक तांबारे यांनी दिली आहे.



गावातील रस्त्यांसाठी आमदार डॉ. संजय रायमुलकर यांच्याकडे जवळपास एक कोटी रुपयांच्या रस्त्याची मागणी केली आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची शेतातील पाहणी करण्यासाठी दि.१३ सप्टेंबर रोजी डॉक्टर संजय रायमुलकर आमदार हे डोणगाव येथे आले असता आम्ही डोणगाव साठी जवळपास एक कोटी रुपये रस्त्याच्या कामाची आमदारांच्या कडे मागणी केली आहे.गावाचा सर्वांगिण विकास करण्याला आपले प्रथम प्राधान्य राहणार असल्याची माहितीही सरपंच शिवचरण विजयराव आखाडे यांनी दिली आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# 'मुख्यमंत्री योजनादूत'; अर्ज करण्यास १७ सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** शासनाच्या विविध योजनांची सर्वसामान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली असून आता १७ सप्टेंबर २०२४ पर्यंत नोंदणी अर्ज करता येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर अर्ज करावा, असे आवाहन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर एक तर शहरी भागात प्रत्येक पाच हजार लोकसंख्येमागे एक अशा पद्धतीने राज्यात एकूण ५० हजार योजनादूतांची सहा महिन्यांसाठी निवड केली जाणार आहे. या योजनादूतांना दरमहा १० हजार रूपये मानधन दिले जाणार आहे. हे योजनादूत शासनाच्या लोककल्याणकारी योजनांबाबत नागरिकांना माहिती देतील. या उपक्रमासाठी आतापर्यंत १ लाख ६६ हजारांहून अधिक उमेदवारांनी नोंदणी केली आहे.




या योजनेत सहभागी होण्यासाठी इच्छुक उमेदवार १८ ते ३५ वयोगटातील असावा, उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक आहे, उमेदवाराकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. उमेदवारास संगणक ज्ञान असावे. त्याच्याकडे अद्ययावत मोबाईल (स्मार्ट फोन) आणि आधारसंलग्न बँक खाते असणे आवश्यक आहे.

मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज, आधार कार्ड, पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे / प्रमाणपत्र इ., अधिवासाचा दाखला. (सक्षम यंत्रणेने दिलेला), उमेदवाराकडे आधार जोडणी असलेल्या बँक खात्याचा पुरावा, पासपोर्ट आकाराचा फोटो, हमीपत्र (ऑनलाईन अर्जासोबतच्या नमुन्यामधील) नियुक्तीवेळी सादर करणे आवश्यक आहे. दि. १७ सप्टेंबर २०२४ पर्यंत इच्छुक उमेदवारांना www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल. योजनादूत पोर्टलवर ज्या उमेदवारांनी नोंदणी केली आहे अशा उमेदवारांनी Apply बटन दाबून अर्ज Submit करायला विसरू नये. तरच नोंदणीची प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

## संक्षिप्त...

### मोहमद पैगंबर जयंती आणि गणेश विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर नाशिक पोलीस ॲक्शन मोडवर



दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** मोहमद पैगंबर जयंती आणि गणेश विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्र्वभूमीवर नाशिक पोलीस ॲक्शन मोडवर आले असून नाशिक पोलिसांच्या वतीने आज जुने नाशिक परिसरात आणि गणपती विसर्जन मिरवणूक मार्गावरून रूट मार्च काढलाय. पैगंबर जयंतीचा जुलूस आणि मुख्य गणपती विसर्जन मिरवणूक निघणार असून याच मार्गावर पोलिसांकडून संचालन करण्यात आलं. नाशिक मध्ये १६ तारखेला पैगंबर जयंती साजरी होणार आहे. तसेच १७ तारखेला गणेश विसर्जन मिरवणूक आहे. त्यामुळे जुलूस मार्ग आणि विसर्जन मिरवणूक मार्गाची पाहणी आज पोलिसांकडून करण्यात आली. एक महिन्यापूर्वी नाशिक मध्ये याच भागात दंगल झाली होती त्यामुळेच नाशिक पोलिसांनी पोलिसांनी आज शक्ती प्रदर्शन करून गुन्हेगार आणि समाजकंटकांवर वाचक बसवण्याचा प्रयत्न केलाय. दरम्यान यावेळी नाशिक पोलिसांकडून सशस्त्र संचलन करण्यात आले.

### उद्या सह्याद्री अतिथिगृहावर धनगर समाज आणि मुख्यमंत्री यांच्यासोबत ॲडव्होकेट जनरलसह होणार आरक्षणावर चर्चा



दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी :** आरक्षणासाठी धनगर समाजाचे पंढरपुरात राज्यव्यापी उपोषण सुरू आहे. या उपोषणकर्त्यांशी चर्चा करण्यासाठी आज मंत्री चंद्रकांत पाटील आणि शंभूराजे देसाई पंढरपुरात आले होते. त्यावेळी धनगर बांधवांनी आम्हाला कायदा कळत नाही फक्त प्रमाणपत्र द्या, अशा आग्रहाची मागणी केली. तसेच आम्हांला मंत्री नको मुख्यमंत्र्यांशी चर्चा हवी, अशी ही मागणी झाली. यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्या दुपारी मुंबई येथे सह्याद्री अतिगृहावर बैठकीसाठी वेळ दिली आहे. यानंतरही धनगर बांधवांचे पंढरपुरात उपोषण सुरू आहे. त्यामुळे आजची चर्चा केवळ निष्फळ ठरली. धनगर आरक्षणाबाबत आणि पंढरपुरातील उपोषणाबाबत आता तोडगा उद्या मुंबई येथील मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत निघणार आहे.

### ८० मुलींना सायकल वाटप



दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** मानव विकास योजनेतंर्गत डोणगाव येथील श्री शिवाजी हायस्कूलमधील ८० मुलींना सायकल वाटप करण्यात आल्या. ग्रामीण भागातील मुलींना शैक्षणिक सुविधा मिळाव्या, त्यांचे शिक्षणाचे प्रमाण वाढावे, यासाठी शासनाच्या वतीने विविध उपाययोजना केल्या जात आहेत. त्याचबरोबर हायस्कूलमध्ये शिक्षण घेणार्या मुलींना मानव मिशन योजनेतंर्गत सायकल वाटप करण्यात येत आहे. या योजनेतंर्गत डोणगाव येथील श्री शिवाजी हायस्कूलमधील ८० मुलींना संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र आखाडे यांच्याहस्ते व गटविस्तार अधिकारी प्रमोद रायमुलकर, सरपंच शिवचरण आखाडे,माजी उपसरपंच जुबेर यांच्या प्रमुख उपस्थितीत सायकली वाटप करण्यात आल्या. यावेळी संस्थेचे प्राचार्य, उपप्राचार्य यांच्यासह शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांसह विविध मान्यवरांची उपस्थिती होती.

### "आनंद दिघे आज असते तर", ठाण्यात पैसे उधळण्याच्या घटनेवर शिवसेना उबाठा गटाच्या नेत्यांची टीका

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेनेचे दिवंगत ठाणे जिल्हा प्रमुख आनंद दिघे यांच्या टेंभी नाक्यावरील आनंद आश्रमात शिंदेच्या शिवसेनेचे काही पदाधिकारी नोटा उधळतानाची एक चित्रफीत सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. यावरून आता शिवसेनेच्या दोन्ही गटात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. आश्रमात पैसे उडविणारे शिवसैनिक बारमध्ये जाणार होते, म्हणूनच त्यांनी त्यापद्धतीप्रमाणे पैसे उधळले, असा आरोप उबाठा गटाचे आमदार वैभव नाईक यांनी केली. स्व. आनंद दिघेंनी त्याकाळी बार फोडून सामान्य माणसाला न्याय दिला होता. पण त्याच दिघे साहेबांच्या आश्रमात बारप्रमाणे पैसे उडविले जाणे, हा दिघे साहेबांचाच अवमान आहे, अशीही टीका नाईक यांनी केली.स्व. आनंद दिघेंच्या घरात भिंतीवर एक हंटर लावलेला होता. काल आनंद आश्रमात झालेला धिंगाणा आनंद दिघेंनी पाहिला असता तर भिंतीवरील हंटर काढून त्यांनी लुटीचा पैसा उधळणाऱ्यांना फोडून काढलं असतं. जे स्वत:ला आनंद दिघेंचा वारसादार मानतात, त्यांना आम्ही सांगू इच्छितो की, हा आनंद दिघेंचा वारसा नाही. आनंद दिघे अशाप्रकारच्या लोकांचे कधीच समर्थन करत नसत.

# १८ पोलीस पाटलांची पदे रिक्त

## चान्नी ठाणे हद्दीतील चित्र : रिक्त पदे भरण्याची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**पातूर :** पोलीस विभाग व ग्रामस्थ यांच्या दरम्यानची कळी म्हणजे पोलीस पाटील असते, गाव पातळीवर कुठल्याही प्रकारची अनुचित घटना, आत्महत्या, व अवैध धंदे वादविवाद आदी बाबतची माहिती पोलीस पाटलांना पोलीस प्रशासनाला द्यावी लागते, यास उद्देशाने शासनाने पोलीस पाटलांच्या नियुक्त्या केल्या होत्या मात्र पातूर तालुक्यातील चान्नी ठाणे हद्दीतील गेल्या अनेक वर्षापासून चान्नी ठाणे हद्दीतील चांगेफळ झरंडी वसाली उंबरवाडी पिंपळडोळी जांब मळसुर तुलंगा खुर्द अंधार सांगवी सांगोळा बु. पांगरा उमरा शिरपूर सस्ती सायवणी धाडी चान्नी आदी १८ पोलीस पाटलांची पदे रिक्त असल्याने त्या गावातील माहिती पोलीस प्रशासनाला मिळण्यास मदत होत नाही, चान्नी ठाणे हद्दीतील काही पोलीस पाटील सेवानिवृत्त झाले, तर काहींचा मृत्यू झाला, त्यामुळे अनेक वर्षापासून पोलीस पाटलांची १८ पदे रिक्त असल्याने शासनाने सदर रिक्त पदे तातडीने भरावी अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.




पोलीस पाटील हे ग्रामीण भागातील जनतेचा दुवा असते, प्रत्येक गावाला पोलीस पाटील असल्यास पोलीस प्रशासनाला सोयीचे होते.आणि तत्काळ गाव पातळीवरील माहिती मिळते, त्यामुळे पोलीस पाटलांची रिक्त पदे भरणे आवश्यक आहे.

**-रवींद्र लांडे ठाणेदार पोलिस स्टेशन चान्नी**

### पोलीस पाटलांची जबाबदारी काय असते !

गावातील कायदा व सुव्यवस्था चांगली ठेवणे, गावाच्या हद्दीत घडलेल्या गुन्ह्यांची माहिती पोलिसांना कळविणे, पोलिसांना गुन्ह्यांच्या चौकशीत मदत करणे,नैसर्गिक आपत्तीची माहिती तहसीलदारांना कळविणे, तसेच गावाच्या हद्दीत कोणी विनापरवाना शास्त्र बाळगणाऱ्यास काढून घेणे, विविध कामांसाठी ग्रामस्थांना दाखला देणे,आदी कामे व जबाबदारी पोलीस पाटलांची असते,

### ऐन गणेशोत्सवात पुण्यात पुन्हा गोळीबार, घरातच झाडल्या ३ गोळ्या; एक जण गंभीर जखमी

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यात उरुळी कांचनम धल्या इनामदार वस्तीवर गोळीबाराची घटना घडलीय. यात एक जण जखमी झाला असल्याची माहिती समोर आलीय. काळूराम गोते असं जखमी झालेल्या व्यक्तीचं नाव आहे. त्यांच्यावर तीन गोळ्या झाडण्यात आल्या आहेत. काळूराम यांना पुण्याला हलवण्यात आले आहे. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून अधिक तपास करत आहेत.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, उरुळी कांचन इथे इनामदार वस्तीवर राहणाऱ्या दशरथ शितोळे यांच्या घरी काळूराम गोते गेले होते. तेव्हा दशरथ शितोळे आणि काळूराम गोते यांच्यात रिंगरोड जमिनीच्या पैशाच्या व्यवहारावरून वाद झाला. या वादातूनच संतापलेल्या दशरथ शितोळे यांनी काळूराम गोते यांच्यावर गोळीबार केला. तीन गोळ्या झाडण्यात आल्या. यात जखमी झालेल्या काळूराम गोते यांना उपचारासाठी पुण्याला हलवण्यात आलं आहे. घटनास्थळी पोलीस दाखल झाले आहेत.



श्री मोरया गणेश मित्र मंडळ, डोणगांव

### केशर पान मसाला कंपनी मालकाच्या पत्नीचा अपघातात मृत्यू, आग्रा एक्स्प्रेस वे वरची घटना

**मुंबई/प्रतिनिधी :** केशर पान मसाला या कंपनीचे मालक हरीश मखिजा यांच्या पत्नी प्रीती मखिजा यांचा अपघाती मृत्यू झाला. हरीश मखिजा आणि त्यांच्या पत्नी प्रीती यांचा कारचा टायर आग्र लखनौ एक्स्प्रेस वे वर अचानक फुटला आणि हा भयंकर अपघात झाला. केशर पान मसाला कंपनीचे मालक हरीश मखिजा, त्यांच्या पत्नी प्रीती मखिजा, मद्य व्यावसायिक तिलक राज शर्मा यांची पत्नी आणि चालक असे चौघेजण प्रवास करत होते.

या अपघातात प्रीती मखिजा यांचा मृत्यू झाला आहे तर इतर सगळे प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. केशर पान मसाला ही कानपूरची प्रसिद्ध मसाला कंपनी आहे. माइलस्टोन ७९ जवळ हरीश मखिजा यांच्या कारचा अपघात झाला. या अपघातात त्यांच्या पत्नी प्रीती मखिजा यांचा मृत्यू झाला आहे. हरीश मखिजा उत्तर प्रदेश विधानसभा अध्यक्ष सतीश महाना यांचे नातेवाईक आहेत. त्यांच्या कारचा टायर फुटून हा अपघात झाला.

# भाजप नेते हर्षवर्धन पाटील यांची पत्रकार परिषद

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** एप्रिल १९५५ च्या औद्योगिक विकास नियमन कायद्यातील कलम ३ (भाग ३) द्वारे साखरेचा अंतर्भाव अत्यावश्यक वस्तू या व्याख्येत करण्यात आलेल्या आहे. त्याच्या अंतर्गत साखरेचे उत्पादन, साठवणूक, विक्री, वितरण यासंबंधीचे सर्व अधिकार आणि नियंत्रण केंद्र सरकारकडे ठेवण्यात आलेली आहेत. १९६० पासून देशभरातील साखर उद्योगामध्ये बरेच बदल आणि स्थित्यंतरे झालेली आहेत. नवनविन तंत्रज्ञान आले आहे. तसेच मूल्यावर्धित, उपपदार्थांची यादीही विस्तारली आहे. या पार्श्र्वभूमीवर जुन्या आदेशात बदल करणे क्रमप्राप्त झाल्याने, केंद्रीय अन्न, ग्राहक व्यवहार आणि सार्वजानिक वितरण मंत्रालयाने सध्याच्या साखर (नियंत्रण) आदेश १९६६ आणि साखर दर (नियंत्रण) आदेश २०१८ या दोन आदेशांचे एकत्रीकरण करून नव्या शुगर (कंट्रोल) ऑर्डर २०२४ चे प्रारूप २२ ऑगस्ट २०२४ रोजी पारित केले असून त्यावर सूचना दुरुस्त्या २३ सप्टेंबर २०२४ पर्यन्त मागवल्या आहेत. नव्या आदेशातील एकूण १५ सेक्शन वर सेकशन निहाय सविस्तर विचार मंथन करण्यासाठी आम्ही देशभरातील सर्वच प्रमुख संस्था, तसेच महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, उत्तर प्रदेश, राज्यातील सहकारी साखर संघ, खाजगी साखर उद्योगांचे प्रमुख; तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे प्रतिनिधी, साखर विषयातले तज्ज्ञ, शुगर टैंडर्स, चिनी मंडी अशा एकूण ५५ निवडक प्रतिनिधींना एका व्यासपीठावर एकत्र आणले आणि गेल्या ३-४ तासापासून संपूर्ण विषयावर सखोल साधक बाधक विचार विनिमय करण्यात आला. चर्चेतून एकमताने पुढे आलेल्या सूचनांचे एकत्रिकरण करून ते केंद्र शासनाशी संबंधित विभागाला २३ सप्टेंबर पूर्वी सादर करण्यात येणार आहे. या विचार मंथनातून नव्याने अस्तित्वात येणारा साखर (नियंत्रण) आदेश २०२४ अधिक व्यापक आणि उद्योगासमोरील अडचणी सोडवणारा आणि सर्वसामान्य ऊस उत्पादक शेतकऱ्यांना जास्तीचा आर्थिक लाभ देणारा असू शकेल असाच आमचा प्रयत्न राहील.



# बाबासाहेब नाईक विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा

## एन. एम. एम. एस. परिक्षेत खुला प्रवर्गातून ग्रामीण चा विद्यार्थी प्रथम

दैनिक आपला विदर्भ

■ नासीर शेख

**पातूर :** येथील बाबासाहेब नाईक विद्यालय हे अतिशय दुर्गम भागात व डोंगराळ भागात असून प्रत्येक बाबतीत विद्यालयातील विद्यार्थी आघाडीवर आहेत शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये झालेल्या एन. एम. एम. एस परिक्षेत खुला प्रवर्गातून बाबासाहेब नाईक विद्यालय सावरगाव विद्यालयाचा विद्यार्थी नकुल मनोहर आडे याने प्रथम क्रमांक पटकावला अकोला येथे एन. एम. एम. एस परिक्षेत क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा माध्यमिक शिक्षणाधिकारी माध्यमिक यांचे वतीने आर एल टी कॉलेज अकोला येथे पार पडला यामध्ये बाबासाहेब नाईक विद्यालय सावरगांव येथील विद्यार्थी नकुल मनोहर आडे याचा आर एल टी कॉलेज येथे सत्कार करण्यात आला यावेळी अकोला जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ सुचिताताई पाटेकर यांचे हस्ते सत्कार करण्यात आला व मार्गदर्शक तथा शिक्षक विजय राठोड यांचा सुद्धा सत्कार या प्रसंगी करण्यात आला स्वामी विवेकानंद संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रामसिंगजी जाधव यांनी विद्यार्थीचे कौतुक केले विद्यार्थी आपल्या यशाचे श्रेय विद्यालयाचे मुख्याध्यापक शिक्षक यांना देत आहे तसेच विद्यालयाच्या वतिने मुख्याध्यापक पि जे राठोड व्ही पी राठोड जि डी राठोड सुनील पाटकर अनिल आयस्कार शिवगंगा आडोळे दिपक चवरे संजय राठोड वसंत राठोड जा. रा जाधव यांनी विद्यार्थीचे अभिनंदन केले. नकुलच्या या यशाने नाईक विद्यालयाच्या नावावर मानाचा तुरा लागला आहे.



# विविध वृत्त...

## आगामी सण-उत्सवाच्या पार्श्वभूमीवर बुलढाणा पोलिसांचा रूट मार्च



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : आगामी सण उत्सव जसे की गणेश विसर्जन, ईद ए मिलाद दरम्यान शहरात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये व कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी आज बुलढाणा शहरातील मुख्य मार्गावरून बुलढाणा पोलिसांचा रूट मार्च काढण्यात आला. या रूटमार्चला बुलढाणा शहर पोलिस स्टेशनपासून सुरुवात झाली.. त्यानंतर जयस्तंभ चौक, बाजार लाईन इकबाल चौक जनता चौक, कारंजा चौक असे मार्गक्रमण करीत परत बुलढाणा शहर पोलिस स्टेशनमध्ये रूट मार्चचा समारोप करण्यात आला. या रूट मार्चमध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील, बुलढाणा शहर पोलिस स्टेशनचे निरीक्षक नरेंद्र ठाकरे आणि पोलिस कर्मचारी, होमगार्ड सहभागी झाले होते.

## बुलढाणा जिल्हा होमगार्ड सदस्य नोंदणी यादी प्रसिध्द; उमेदवारांनी आपल्या गुणांबाबत हरकती आक्षेप नोंदवाव्यात

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : जिल्ह्यात दि. २८ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२४ या कालावधीत होमगार्ड सदस्य नोंदणी घेण्यात आली. या नोंदणी दरम्यान पात्र उमेदवारांच्या तांत्रिक अर्हता मैदानी चाचणीत घेतलेल्या गुणांची उमेदवारांची यादी होमगार्ड संघटनेच्या खालील संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. http://Maharashtracdhd.gov.in/mahahg/enrollmentadd.php जाहीर केलेल्या यादीतील उमेदवारांच्या नावासमोर तांत्रिक आणि मैदानी गुण दर्शविण्यात आलेले आहेत. उमेदवारांना आपल्या गुणांबाबत हरकती आक्षेप असल्यास कार्यालयीन वेळेत लेखी स्वरूपात स्वतःच्या नांव नोंदणी अर्ज क्रमांक चेस नंबर मोबाईल क्रमांक सह दि. १५ ते १६ सप्टेंबर, २०२४ या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत जिल्हा होमगार्ड कार्यालय, बुलढाणा येथे स्वतः हजर राहून किंवा कार्यालयाच्या dchg buldhanayahoo.com या ईमेल आयडीवर नोंद करावी. सदरच्या दोन्ही दिवशी जिल्हा होमगार्ड कार्यालय सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत चालू राहणार आहे. दिनांक १६ सप्टेंबर, २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजेनंतर प्राप्त होणाऱ्या हरकत व आक्षेपांची नोंद घेतली जाणार नाही, असे जिल्हा समादेशक होमगार्ड तथा अप्पर पोलिस अधीक्षक बी. बी. महामुनी यांनी कळविले आहे.

## गुलामीच्या खुणा पुसण्याचे काम मोदी करत आहेत, मी त्यांचे आभार मानतो - उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी** : अंदमान निकोबारची राजधानी असलेल्या पोर्ट ब्लेअरचे श्री विजयपुरम असे नामकरण करण्यात आले, त्यावर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आनंद व्यक्त करत गुलामगिरीच्या खुणा पुसल्या पाहिजेत, गुलामगिरीच्या खुणा पुसून टाकण्याचे काम नरेंद्र मोदींनी केले पाहिजे, असे सांगितले. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.सोयाबीनबाबत फडणवीस म्हणाले की, भारत सरकारने कच्च्या तेलावरील आयात शुल्क २०% वरून वाढवून ३२.५% केले आहे याचा थेट फायदा सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना होणार असून, सोयाबीनच्या भावात मोठ्या प्रमाणात वाढ होणार आहे, त्यासोबतच केंद्र सरकारने कांद्यावरील किमान निर्यात मूल्य रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे ड्युटी ४० वरून २० वर आणली आहे, कांद्याच्या कोणत्या सक्तीचा फायदा होणार, कांदा बरोबरच बासमती तांदळालाही निर्यात करण्याची परवानगी होती, मात्र निर्यात शुल्क होते, ते शून्यावर आणले आहे, त्यामुळे आमच्या धान उत्पादक शेतकऱ्यांना. त्याचा फायदा होणार आहे, एकंदरीत आपल्या पंतप्रधानांनी शेतकऱ्यांना मोठी भेट दिली आहे, मी पंतप्रधानांचे आभार मानतो.

## लाठीचार्जनंतर जरांगे निघून गेलेला, त्याला नेत्यांनी आणून बसवले; छगन भुजबळांच्या दाव्याने खळबळ

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी** : राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी अंतरवाली सराटीतील आंदोलनाबाबत खळबळजनक दावा केलाय. वर्षभरापूर्वी अंतरवालीत झालेल्या लाठीचार्जवेळी पोलीस कारवाईनंतर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील तिथून निघून गेले होते. पण नेत्यांनी मनोज जरांगे पाटलांना तिथे आणून बसवले असा आरोप भुजबळांनी केलाय. छगन भुजबळ यांनी यात रोहित पवार आणि राजेश टोपे यांच्यावर आरोप केले असून शरद पवार यांचंही नाव घेतलेय.

# डिझेल चोरी करणारी टोळी पोलिसांच्या जाळ्यात

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी:** उभ्या ट्रक मधून डिझेलची चोरी करणाऱ्या तीन जणांना पोलिसांनी अटक करून ७ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई दि.१३ सप्टेंबर रोजी सकाळी ४.३० वाजताच्या दरम्यान बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्गावरील नागपुर मुंबई लेनवर येनेज क्रमांक ३१० मांडवा शिवारामध्ये इंडीयन ऑईल पेट्रोल पंपाजवळ केली.

घटनेबाबत प्राप्त माहितीनुसार दि.१३ सप्टेंबर रोजी सकाळी समृद्धि महामार्गावरील मांडवा शिवारातील पेट्रोल पंपजवळ एम. एच. १५ इ. जी.९५१३ वाहनाचा चालक प्रदिपसिंग जसवंतसिंग मान वय ३५ वर्ष रा. लासलगाव ता निफाड जि नाशिक हा ट्रक सव्हिस रोडवर लावून आराम करीत असतांना चालकास डिझेल टाकीचे झाकण उघडल्याचा आवाज आला. म्हणून त्याने खाली उतरुन पाहिले असता दोन इसम ट्रकच्या टाकीतील डिझेल चोरी करीत असतांना दिसले.

चालकने त्यांना हटकताच ते त्यांचे इर्टीगा गाडीत बसुन भरधाव वेगाने पळून जात असतांना त्यांच्या गाडीचा महामार्गाच्या बॅरिगेटला धडकुन त्यांचा अपघात झाला. त्याच दरम्यान बीबी पोस्टेचे पेट्रोलींग वाहन चेकिंग अधिकारी नापोकों नितीन मापारी,पोहेको अशोक अंभोरे सदर ठिकाणावरुन पेट्रोलोंग करीत असतांना त्यांना सदर अपघात दिसल्याने ते अपघातग्रस्त वाहन क्रमांक एम. एच. २८ ही ९३१० जवळ जावुन पहिले असता गाडीत अडकलेल्या चालकस वाहनाचे बाहेर काढले. त्याच दरम्याण त्यांना सदर वाहनामध्ये प्लाटिक




कॅन ठेवल्याच्या दिसुन आल्याने त्यांना संशय आल्याने त्यांनी जखमी चालकस विचारपुस केली असता त्याने मी व माझे सोबत इतर तिन इसम समृध्दी महामार्गावर डिझेल चोरी करण्यासाठी आलो होतो.

आम्ही इंडीयन ऑईल पेट्रोल पंपा जवळ सर्व्हीस रोडवर उभा असलेल्या एका ट्रक चे डिझेल चोरी करीत असतानां ट्रक चालक याने हटकल्याने आम्ही पळून जात असतांना आमचा अपघात झाला व माझे साथीदार पळून गेले सदर माहिति पेट्रोलिंग पोलीसांनी ठाणेदार संदिप पाटील यांना दिल्याने ठाणेदार संदिप पाटील नापोको अरुण सानप यांनी समृध्दी महामार्गावर जावुन जखमी चालक ज्ञानेश्र्वर फकिरबा सोसरे यास विचारपुस करन त्याचे कडुन त्याचे साथीदारांबाबत माहीती घेवुन तो जखमी असल्याने उपचारासाठी ग्रामिण रुग्णालय बीबी येथे भरती करुन फरार आरोपींचा शोध सुरु केला असता शुभम दिपक उबरहंडे वय २५ वर्ष रा. चिखली हा मलकापुर पांग्रा येथे पळून जाण्याच्या बेतात असतांना ताब्यात घेवुन त्यास त्याचे साथीदारांबाबात विचारपुस केली असता त्याने सांगीतले की मी भैय्या नावाचे इसमासोबत आलो होतो. त्यानेच आम्हाला सर्व साहित्य व चोरी करण्यासाठी गाडी पाहिली होती. शुभम उबरहंडे याचे कडुन भैय्या चा मो. नं. घेवुन त्याची तांत्रीक माहीती घेवुन शोध घेतला असता तो भिमराव दगडू इंगळे रा मांडवा यांचे कपाशीचे रोगा तुरीच्या पाटयामध्ये लपलेला मिळुन आला. त्याला विजय सुदाम साळवे यांचे समक्ष ताब्यात घेतले.

हर्षद ऊर्फ भैय्या पांडुरंग साबळे वय २३ वर्ष रा डौलखेड ता जाफ्राबाद जि जालना असे सांगितले. तो जखमी असल्याने त्यास ग्रामिण रुग्णालयात आणून त्याचेवर औषधउपचार करून पो स्टे ला हजर केले. त्यानंतर त्याच्या ईतर साथीदारांच्या वर्णनावरून पोलीस पथकाने आरोपी संकेत सुनिल बोर्ड रा. शेळगाव आटोळ हा मलकापुर पांग्रा येथुन ताब्यात घेवुन पो स्टे ला आणून हजर केले. आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला. आरोपीकडून ७ लाख ५,५०० रुपये किमती चा मुद्देमाल जप्त केला. पुढील तपास ठाणेदार संदिप पाटील, सफो परमेश्वर शिंदे , चापोहेकों अशोक अंभोरे, मापोको नितीन मापारी, नापोकी अरुण सानप पोकों यशवंत जैवळ पोकों रविंद्र बोरे पोकों भारत ढाकणे हे करीत आहे.

### आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम प्रवेशित विद्यार्थीसाठी आनंदाची बातमी

# डिमांड ड्राफ्ट ऐवजी चेकने स्वीकारल्या जाणार प्रवेश शुल्क

### केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केली होती सुचना

दैनिक आपला विदर्भ




**बुलडाणा/प्रतिनिधी** : आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रियेदरम्यान सार्वजनिक सुट्ट्या असल्याने प्रवेशित विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी डिमांड ड्राफ्ट ऐवजी चेकने (धनादेशाने ) शुल्क स्वीकारल्या जावे अशी सूचना केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केल्या होत्या. त्यानंतर सीईटी विभागाने या संदर्भाचे पत्रकच निर्गमित केले आहे.

आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या सन २०२४ २५ सत्राकरिता प्रवेश प्रक्रिया सध्या सुरू आहे.

प्रवेशित विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेसाठी सादर करावयाच्या शुल्कची रक्कम ही डिमांड ड्राफ्टद्वारे स्वीकारल्या जाते शनिवार रविवार आणि सार्वजनिक सुट्टी मुळे बँकिंग व्यवहार हे बंद राहत असल्याने (BAMS) प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी वेळेत डिमांड ड्रॉप काढणे ही मोठी अडचण निर्माण झाली होती केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी बी ए एम एस प्रवेशीत विद्यार्थीची ही अडचण लक्षात घेवुन आरोग्य मंत्रालयातील अधिकाऱ्यांशी त्यांनी चर्चा केली आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया संदर्भातील शुल्क डिमांड ड्राफ्ट ऐवजी चेक द्वारे स्वीकारण्याच्या सूचना यंत्रणेला दिल्यात.

सी ई टी विभागाने यासंदर्भातील सुचना पत्रकच निर्गमित केले आहे त्यामुळे आता (BAMS) आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांना आता डिमांड ड्राफ्ट डिडि) ऐवजी चेक (धनादेशाद्वारे)प्रवेश प्रक्रिया शुल्क भरता येणार आहे.



## भुकेल्या बाळाला दूध पाजणाऱ्या महिला पोलीस कर्मचाऱ्याचे आमदार संजय गायकवाड यांच्याकडून स्वागत

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** :सद् रक्षणाय, खल निग्रहणाय हे ब्रीदवाक्य घेऊन लोकांच्या रक्षणार्थ पोलीस खाकी घालून आपले कर्तव्य पार पाडत असतात. मात्र या खाकीमध्येही शेवटी एक मनुष्य असून या खाकीत एक वडिलाचं प्रेम, एक आईची 'ममता' लपलेली असते. याचा प्रत्यय बुलढाण्यातील एका घटनेतून आला होता अवघ्या एक दिवसाच्या भुकेल्या अनोळखी चिमुकलीला बुलढाणा शहर ठाण्यात कार्यरत असलेल्या महिला पोलीस कर्मचारी योगिता शेळके यांनी चक्क आपलं स्वतःचं दूध पाजून त्या चिमुकलीला शांत केले. या महिला कर्मचाऱ्यानं केलेल्या या कार्यामुळे त्यांचं कौतुक तर होतच आहे. मात्र या प्रकारामुळे खाकीमधली ममता देखील सर्वांसमोर आली होती. याची दखल घेत बुलढाण्याचे शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी बुलढाणा शहर पोलीस स्टेशनमध्ये जाऊन महिला पोलीस कर्मचारी योगिता शेळके यांचे स्वागत केले आहे. यावेळी आईची किंमत जगामध्ये काय आहे हे योगिता शेळके यांनी दाखवून दिले अशी प्रतिक्रिया आमदार संजय गायकवाड यांनी यावेळी दिली आहे.

# श्री शिवाजी सहकारी पतसंस्था व स्नेहकिरण धान्य गोडाऊन चिखली च्या वतीने शेतकऱ्यांचा मार्गदर्शन मेळावा संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी** : श्री शिवाजी सहकारी पतसंस्था व स्नेहकिरण गोडाऊन अंतर्गत मालतारण कर्जदार शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष किरणराव सरनाईक आमदार अमरावती विभाग हे होते. मार्गदर्शक म्हणून घमराव घुगे मुख्य लेखापरीक्षक हे होते

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवाजी सहकारी पतसंस्थेचे शाखा व्यवस्थापक राऊत यांनी केले. त्यांनी पतसंस्थेच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या सवलती याबद्दल विविध योजनांची माहिती दिली.मुख्य लेखा परीक्षक घमराव घुगे यांनी शेतकऱ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले किरणराव सरनाईक आमदार अमरावती विभाग यांनी या पतसंस्थेच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या सवलती बद्दल सखोलपणे माहिती दिली.ज्या शेतकऱ्यांनी माल ठेवलेला आहे त्यांनी सप्टेंबर महिन्याच्या ३० तारखेपर्यंत माल नेल्यास त्यांना भाडे सवलत तथा घेतलेल्या कर्जावरील पूर्ण व्याज माफ करणे अशा अनेक सवलती बद्दल माहिती त्यांनी दिली. सर्वांनी या गोडाऊनचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. यावेळी मंगेश सरनाईक व शेतकऱ्यांनी मनोगत व्यक्त केले त्यामध्ये त्यांनी कोल्ड स्टोरेज ची मागणी केली तसेच आणखी एक गोडाऊन या ठिकाणी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी केली यावर किरणराव सरनाईक यांनी आणखी एक गोडाऊन बांधून दिले जाईल याबद्दल माहिती दिली या कार्यक्रमाला माजी सरपंच शंकरराव गायकवाड तंटामुक्ती अध्यक्ष मंगेश सरनाईक स्वप्निलजी सरनाईक अकोला जिल्हा मध्यवर्ती चे शाखा



व्यवस्थापक सुबोध घुगे प्रभाकर पाटील तथा शेकडो शेतकरी उपस्थित होते यावेळी अशोक वाकळे यांचा हे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला सूत्रसंचालन चंद्रकांत शिंदे सर यांनी केले तर आभार अनिल मडके सर यांनी मानले.




जय शंभो गणेश मित्र मंडळ डोणगांव

# बालिकेचे अपहरण करुन खून करणारा आरोपी पोलीसांचे ताब्यात

दैनिक आपला विदर्भ

**नंदूरबार/प्रतिनिधी** : १० सप्टेंबर रोजी तळोदा येथील १३ वर्षीय अल्पवयीन बालिकाचे अपहरण होऊन खून झाल्याची घटना घडली. घटना संवेदनशील असल्याने पोलिसांनी तपासाचे चक्र फिरवत आरोपीला अवघ्या ४८ तासात जेरबंद केले आहे.

सदर पीडित मुलगी तिचे भावासोबत शाळेत जाते असे सांगून घरातुन निघुन गेली. दुपारी शाळा सुटल्यावर मुलगा हा एकटाच घरी आला पालकांनी बहिणीबद्दल विचारपूस केली असता मुलाने सांगितले की, ती एक लाल रंगाच्या मोटार सायकलवर बसून कुठे तरी निघुन गेली आहे. त्यावरुन पालकांनी तिचे शाळेत व आजु-बाजुच्या परीसरात तिचा शोध घेतला असता अल्पवयीन बालिका मिळून आली नाही. त्यावरुन तळोदा पोलीस ठाणे येथे अज्ञात इसमाविरुध्द् अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला.अपहरण झालेल्या बालिकेचा तळोदा पोलीस व नंदुरबार स्थानिक गुन्हे शाखेमार्फत शोध सुरू होता. १२ सप्टेंबर रोजी संध्याकाळी तळोदा तालुक्यातील एका शेतात प्रेत पडलेले असल्याची माहिती तळोदा पोलीसांना मिळाली. तळोदा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि राजु लोखंडे व पोलीस अंमलदार हे तात्काळ घटनास्थळी पोहाचले. त्यांनी प्रेताची नातेवाईकांकडून ओळख पटवून घेतली व वरीष्ठांना घटनेबाबत माहिती दिली.

सदर घटना अतिशय गंभीर असल्याने नंदुरबार जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस, अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे, अक्कलकुवा उप विभागाचे उप विभागीय पोलीस अधिकारी दर्शन दुगड, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. किरणकुमार खेडकर, पोनि श्री. हेमंत पाटील व इतर पोलीस अधिकारी हे तात्काळ घटनास्थळी पोहोचले.



घटनास्थळाची पाहणी झाल्यानंतर पोलीस अधीक्षक यांनी अज्ञात आरोपीचा तात्काळ शोध घेण्यासाठी तळोदा, नंदुरबार शहर, अक्कलकुवा व शहादा पोलीस ठाणे सह स्थानिक गुन्हे शाखेची वेगवेगळी पथके तयार करुन त्यांना तात्काळ तपासकामी रवाना केले.१३ सप्टेंबर रोजी तपास पथकास गुन्ह्यातील संशयित इसमाच्या राहते ठिकाणाबाबतची माहिती मिळाली. त्यावरुन पोलीस पथकाने तात्काळ संशयीत आरोपीस ताब्यात घेतले. आरोपीस विश्र्वासात घेऊन घटनेबाबत विचारपुस केली असता त्याने घडलेल्या गुन्हयाबाबत सविस्तर माहिती दिली.सदरची कामगिरी नंदुरबार जिल्हा पोलीस अधीक्षक. श्रवण दत्त. एस, अपर पोलीस अधीक्षक. आशित कांबळे, अक्कलकुवा उप विभागाचे उप विभागीय पोलीस अधिकारी. दर्शन दुगड यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक , किरणकुमार खेडकर, अक्कलकुवा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गुलाबराव पाटील, तळोदा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक. राजु लोखंडे, याच्या पथकाने केली आहे.